# लेह, जम्मू व श्रीनगर आम्ही पाहिलेले

## जून 2005

**10-06-2005**

आज लेह हून दिल्लीला आलो. आराम करतोय कारण दिवसभर काही उद्योग नाहीए विशेष. एवढ्या मोठ्या दिल्लीच्या बाजारात पण खरेदी करायची इच्छा होत नाहीए. खरेदीची सगळी हौस श्रीनगर आणि लेहला पूर्ण झाली. आता.......

नितिन आणि मुलं न्यू दिल्ली स्टेशनवर ''मिलिए मौत से'' शोधायला गेलेत – जातायेत. मी विचार केला लिहूनच टाकते प्रवासीची डायरी. एकदा गेल्यावर मग राहूनच जाते.

....... केलीच हं शेवटी खरेदी !

**01-06-2005**

आज इंदूरहून दिल्लीला निघालो तशी सकाळपासून सुट्टी असून ही निघे पर्यंत सामानाची आवरा–आवरी उरकली कशी तरी.

परवाच वर्तमान पत्रत हिमपातामुळे लेह–श्रीनगर मार्ग बंद झाल्याचे वाचले पण काल राहुलच्या बोलण्यावरून त्यात विशेष काही दम नाही हे तर चालूच राहते असे वाटले तेव्हां hopefully नितिनच्या मनस्वी इच्छेप्रमाणे आम्ही श्रीनगर–लेह मार्गाने लेहला पाहोचावे अशी आशा आहे. नाही तर श्रीनगर & around तर आहेच. त्याची ही मानसिक तयारी केली आहे.

उज्जैनला स्टेशनवर नूतन आणि शरदकाका पण आम्हाला see off करायला आले होते. प्रवासात असे आदरातिथ्य झाले की आपण एकदम special आहोंत असे वाटते.

शरदकाका ब–याचवेळा काश्मीरला जाऊन आले असावेत. आम्ही जाणार म्हटल्यावर ते पण मनाने श्रीनगर आणि गुलमर्गला पोहोचले होते.

पुढचा प्रवास खादाडीचा – नूतनने आणलेली गरम–गरम मुगाची भजी, रबडी आणि बरोबरची पोळी–भाजी खाऊन झोपलो.

**02-06-2005**

सकाळी निजामुद्दीन स्टेशनवर पोहोचलो तेव्हांच झोप उघडली. Prepaid Taxi घेऊन Airport. खरं तर इतक्या सगळ्या प्रवासानंतर actually दिल्ली ते श्रीनगर कसे पोहोचलो ते आठवावेच लागले. Nothing special really - खाणं–पिणं timepass on ariport.

& 2 &

इतक्या चकरा मारल्या इकडे–तिकडे की शेवटी security guard ने हटकले. बरोबरीच्या प्रवाशांचे 2–3 set बदलून गेले. आजकाल विमान प्रवासही इतका common झाला आहे की प्रवाशांच्या संख्ये पुढे airport lounge अगदी छोटाच वाटत होता. दर 2–3 मिनिटाला एक–एक विमान आपले चालू– वाराणशी काय – बागडोगरा काय – मुंबई, अहमदाबाद आणि हैदराबाद, मद्रासपण.

जम्मू–श्रीनगरच्या प्रवाशांची मात्र विशेष सुरक्षा जांच होते. खरं तर दिल्ली पासूनच आपल्याला दहशतवादाची उपस्थिति कुठे ना कुठे जाणवू लागते.

"मम्मा खाली काय सुंदर दिसतं आहे – सुंदर पर्वत आणि सगळी कडे हिरवं–हिरवं हे नक्की काश्मीर असणार" आनंदच्या या शब्दांनी श्रीनगरच्या आधी माझी झोप उघडली.

Airport वर कॅ.राहुल was there to receive us ! आपल्या Holiday Destination वर somebody to receive us ! किती छान वाटतं. कुठली Taxi घ्यायची ? मग कसं कुठे जायचं, काय करायचं ? हे काही मनात पण येत नाही. It was good feeling to meet him there-

बाहेर पडल्या–पडल्याच सुंदर फुलं आणि थंड हवा यांनी मन एकदम आनंदित झाले.

त्याच्या Army च्या Special गाडीने आम्ही त्याच्या घरी पोहोचलो. छान सजवले आहे घर स्मिताने. शाळेतून येऊन बरेच कष्ट घेऊन तिने आमच्यासाठी अगदी देखणे आणि चविष्ट जेवण बनवले होते.

संध्याकाळी त्याच्या regimental centre वर फिरून आलो. JK li regiment चे regimental centre च श्रीनगरला असल्यामुळे खूपच मोठी army establishment आहे.

त्याची जवानांच्या Mess; Officers Qtr; CEOs Bunglow; जवानांचे quarters – trainees hostel – parode ground – officess – Muuseum – Hall of fame – Training ground different obstacles etc. पाहिले.

Hall of fame मधल्या एक–एक शौर्यचक्र विजेत्यांचे फोटो पाहून मन भरून येते. बहुतेक जवान आणि Officers फार कोवळ्या वयांत धारातिर्थी पडतात असे वाटले त्यांचे फोटो पाहून.

Museum मधली वेगवेगळ्या units ची माहिती वाचताना आपली पण मान गर्वाने उंच होते. स्वतःच्या units विषयी आणि in general Indian Army विषयी अभिमान सर्वांच्या बोलण्यातून पण जावतो.

Training Course मधली सगळी obstacles : 1-16: कधीतरी तफरी – x. plus किंवा लक्ष्य मध्ये पाहिलेली Sequence मध्ये within fixed time comple कराची या छोट्या गोष्टीवरून army मध्ये किती tough training मधून लोकं तयार होतात याची जाणीव होते

कधी family बरोबर कधी सर्वांपासून दूर सतत स्वतःला fit आणि alert ठेवणे सोपे नाही. शारीरिक आणि मानसिक पण. एक वेगळेच जग आहे हे असं वाटतं.

**03-06-2005**

1982–83 च्या आठवणींना उजाळा देत आज श्रीनगर बघायला निघालो.

शंकराचार्य Hill वरून पूर्ण शहर दिसते. दल लेक मध्ये इतक्या सा–या Houseboats उभ्या दिसल्या की पूर्वीचे सुंदर दल लेक हरवले का ? असे वाटले.

शहरात फिरताना सामान्य माणसांमध्ये हिंदूंची अनुपस्थिति प्रकर्षाने जाणवते. बाजार सोडला तर सगळी कडेच in general तुमच्या विषयी लोकांचा in difference कुठे तरी बोचतो. हजरतबलच्या तिकडे तर आणि तो पण शुक्रवारचा दिवस आपण दुस–या देक्षात आल्यासारखं वाटतं. पण ब–याच ठिकाणी गरीबी पण दिसते. क्षिक्षण घेऊन आयुष्य जगून चांगली नोकरी मिळवायची हीच आयुष्याची मोठी achievement वाटते या लोकांना.

जागो–जागी Police आणि army आणि मधूनच कुठेतरी होणारा bomb स्फोट हा तर त्यांच्या आयुष्याचा एक अभिन्न हिस्साच आहे त्याबरोबरच त्यांचे आयुष्य सर्वांसारखेच (?) चालू आहे.

Local लोकांचा सहकार नसताना त्यांचेच रक्षण करत राहायचे आणि ते पण कधी पण प्राणांवर बेतायची शक्यता लक्षात घेऊन local army च्या मानसिकतेचा तिथे जाऊनच विचार करू शकतो आणि peace time मध्ये पण army वर केवढी जवाबदारी आहे याची जाणीव होते.

निक्षात पार्क मात्र पहिल्या इतकीच शांत आणि सुंदर आहे. Horticultural dept. ने develop केलेले सुंदर फुलांचे ताटवे थंड हिरवीगार हिरवळ, मोठी–मोठी चिनारची झाडं आणि या सर्वांमधून वाहणारा पाण्याचा झरा. याचे सौंदर्य वर्णन करायला शब्द अपूरे वाटतात. काश्मीरला भूलोकीचे नंदनवन कां म्हणतात ते समजते.



घरी राहाताना तिथली हवा, वातावरण, पाणी अगदी घरातल्या हवेचा वास आणि पाण्याच्या चवीमध्ये पणे युरोपचा भास होतो.

**04-06-2005**

निघालो अखेर लेहला. श्रीनगर–कारगिल– Halt at night – लेह असा कार्यक्रम होता राहुलच्या ओळखीमुळे relatively स्वस्त मध्य` taxi मिळाली होती.

Regimental Centre हून श्रीनगर cross करे पर्यंत 11 वाजून गेले. 11.30–12 ला सोनमर्गला पाहोचलो. Typical Tourist Place ची गर्दी, Hotels etc. पण आजू–बाजूचे landscape मात्र फारच सुंदर.

काय पोलिस लोकं परेक्षान करतात "पॉच मिनिट में परमिट लेके आता हूँ" असं म्हणून आमचा driver गाडी घेऊन गेला सामानासकट. आमच्या security साठी राहुलने आमच्या बरोबर दोन juniors दिले होते सुटीवर घरी निघालेले लेहला. ते पण त्याच्या बरोबर गेले. सोनमर्ग Zojila चें हून रोज army चा convoy जातो. त्या आधी जाणे जरूरी असतं नाही तर नंतर वाहने सोडत नाही. त्यादिवक्षीची convoy जाण्याची वेळ 2ची होती. 1.30 वाजतां ड्रायव्हर उतरलेल्या चेह–याने आला. त्याचे papers clear झाले नव्हते. थोड्याक्ष्या इकडून तिकडे चकरा, साहेब लोकं जेवायला गेलेले, घड्याळाचा काटा हळू–हळू 2 कडे सरकत होता- Tourist Centre च्या नंतर काही अंतरावर 40–50 गाड्यांचा army चा convoy उभा होता. त्याच्या शेजारून जाताना गाडी थोडी पण slow होऊ देऊ नका असा आम्हाला आदेक्ष देण्यात आला. काश्मीर मध्ये terrorist लोकांचं main target army चे लोकच असतात.

शेवटी परमिटचे काम नाहीच झाले. 2–3 दिवसांपूर्वीच expire झालेले papers आळक्षीपणा मुळे (?) renew न केल्याने driver चे काम झाले नाही. पण army चे जवान बरोबर असूनही त्याचे कागत पुढे सरकले नाहीत, थोडे पैसे offer करून सुद्धा. Security Norms मधून कुठेही ढील मिळत नाही. बिच्चारा ! स्वतःच्या आळक्षीपणाला दोष देत, राहुल साहेबांना कसे तोंड दाखवू असा विचार करून अगदी रडवेला झाला

होता.  शांत बसून काय होतयं ते बघण्या पलीकडे आम्ही काही करू शकत नव्हतो. मधून घड्याळाकडे आणि मधून समोर उभ्या असलेल्या convoy कडे नजर टाकत आम्ही बसलो होतो.

Convoy हलू लागला.  आता श्रीनगरला परत जायचे का ?  असा विचार करत होतो तेवढ्यात टॅक्सी driver दुस–या टॅक्सीवाल्याला घेऊन आला.  Convey आमच्या शेजारून पुढे जाऊ लागला.  इतक्या सा–या गाड्या एवढ्या tedeous रस्त्यावर रोज का जातात असा प्रश्न मनांत होता त्याचे उत्तर आम्हाला पुढे मिळणार होते.

& 5 &

नव्या टॅक्सी मध्ये पटापट सामान हलवून आम्ही तिकडे बसलो.  आम्हाला फक्त 500 च रूपये जास्त लागणार होते.

निघालो शेवटी !  ''या दोन–तीन तासाच्या उशीरामुळे तुम्हाला पुढे पण चार–पांच तास उशीर होणार आहे'' नवा टॅक्सीवाला म्हणाला कारण आता आम्ही convoy च्या मागे त्याच्या speed ने जाणार होतो. ''पण जायला मिळतयं हेच काय कमी'' – आम्हाला सर्वांनाच मला वाटतं हे feeling होते.

पण या नव्या ड्रायव्हरवर 'शफी' राहुलने आमच्या सोबत दिलेला जवान फारसा खुष नाही असे वाटले.  कफ्तान सूट घातलेला typical मुसलमान येणा–या–जाणा–या प्रत्येक टॅक्सी आणि बस ड्रायव्हरला आदाब करत पुढे जात होता.  लेह–श्रीनगर मध्ये सामानाची ने–आण करणारे ट्रक हे सर्व लोक चालवत असावेत असे वाटले.

या पुढचा प्रवास मात्र एक वेगळाच अद्‌भुत अनुभव होता.  चहुंबाजूंनी बर्फाच्छादित शिखरांनी सजलेले पर्वत आणि त्या मधून आधी नदीच्या काठाने आणि मग चढत–चढत शिखराकडे जाणारा वळणा–वळणाचा रस्ता आणि त्यावरून एकामागे एक शिस्तीत चालणारी वाहने.  रोजच्या आयुष्यात कल्पना पण करू शकणार नाही असा तो अनुभव होता.  थोड्या अंतरावर गेल्यावर Army चा एक ट्रक बंद पडला.  प्रवासी Sumo गाड्या convoy च्या पुढे निघून गेल्या होत्या.  उशीर झाल्यामुळे convoy च्या मागे जाणा–या बसेस आणि ट्रक्स बरोबर आम्ही जात होतो.  सर्व गाड्या थांबल्या.  हळू–हळू गाड्यांमधून माणसे बाहेर पडली.  बहुतेक बसेसमध्ये रस्त्याच्या कामासाठी बाहेर पडलेले बिहारी मजूर (स्त्री–पुरूष दोन्ही) होते.  राज्यामध्ये अराजकता माजली आणि अशिक्षिततेचे प्रमाण वाढले की लोकं निर्वासित होतात.  नेपाळी लोकं पण tourist season मध्ये कामाच्या शोधात येतात म्हणे.

बंद पडलेला ट्रक आमच्या ब–याच पुढे असल्यामुळे आम्ही काय चालू आहे याचा नुसता अंदाजच करू शकत होते. एका बस मधून माणसांचा एक group चालत–चालत ट्रकच्या दिशेने गेला. सर्वांनी मिळून ट्रकला हलवायचा प्रयत्न केला असावा.

बसल्या–बसल्या ड्रायव्हर आणि शफीने काही वर्षापूर्वी एक बंद पडलेला टँकर त्याने न हलवू दिल्यामुळे मागे अडकलेली 60–65 वाहने landslide मध्ये दबून शेकडो माणसे दबून गेल्याची गोष्ट सांगितली. वाचलेली काही माणसं कशीतरी चालत गावी परत पोहोचली ती आहेत गावात म्हणे.

& 6 &

लोकांच्या प्रयत्नाने किंवा काही आणखी मदतीने गाड्या पुढे चालू लागल्या. जसजसे वर जात होतो तसे बर्फाचे प्रमाण वाढू लागले. मधे–मधे बर्फाला खोदून रस्ता clear केलेला दिसत होता. काही ठिकाणीतर गाडीच्या खिडकीतून हात बाहेर काढला की हातात बर्फ येत होता. स्वच्छ जागा शोधून ड्रायव्हर गाडी बर्फाच्या जवळ आनंदसाठी नेण्याचा प्रयत्न करत होता.

बर्फाबरोबर थंडी पण होतीच. रस्त्यामधे काही ठिकाणी army चे जवान अशा हवामाना मध्ये पण पाहारा देत उभे होते तर काही ठिकाणी रस्त्याच्या बांधणी आणि रक्षणामध्ये स्वर्गवासी झालेल्या लोकांची स्मारकं दिसली. एक मोठा landmark म्हणजे Captain's मोड. या रस्त्याचा पूर्ण सर्व्हे करणारा Captain शेवटी या अवघड वळणावर गाडी सकट खाईमध्ये पडून गेला !

झोजिला पास cross करून द्रास ला पोहोचलो. पावसाळी हवा, थंडी खूप वाजत होती. हॉटेलच्या मागे बत्र टॉप, टोलोलिंग आणि टायगर हिल दिसत होती. युद्धाच्या आठवणी ताज्या झाल्या.

थंडीमध्ये गरम चहा फारच छान वाटला. चहावाल्याने बरोबर butter लावून भाजलेला ब्रेड आणि काही केकचे pieces पण दिले होते. त्या थंडीत लागलेली त्याची चव फारच छान होती.

थोडं आणखी पुढे गेल्यावर आम्ही टोलोलिंगच्या पायथ्याशी पोहोचलो. तिथे 1999–2000 च्या war मध्ये शहीद झालेल्या जवानांच्या स्मृतिमध्ये स्मारक उभारले आहे.

तिथे उभे राहिल्यावर आपण ही चढून जाऊ शकू इतक्या अंतरावर उभी केलेली पाकिस्तानी चौकी अजूनही दिसते.

नॅशनल highway च्या इतक्या जवळ उभारलेली चौकी आणि तिथे राहणारा पाकिस्तानी company commander level चा माणूस आणि वरती बनवलेले पक्के बंकर थंड हवा हे ऐकले आणि पाहिले की हे युद्ध किती अवघड होते याची प्रत्यक्ष कल्पना करू शकतो.

प्रत्यक्ष वर्तमान पत्रत बातम्या येण्यापूर्वी नागा आणि Sikh बटालियनचे लोकं already प्रयत्न करून आले होते त्यांच्यापण खूप casualties झाल्या होत्या. काही तर नुसते बर्फातच गोठून गेले म्हणे.

आणखी पुढे रस्त्यावर जावे तर तिथेपण bomb shelling होत होते म्हणे. दिवसा पूर्ण बंद आणि रात्री गाडीचे दिवे बंद करून जावे लागत होते. ड्रायव्हर म्हणाला तो त्या दिवसात सामानाचा ट्रक चालवत असे. ते पण असेच दिवे बंद करून. मे—जून पर्यंत Border Force न



पाठविण्याचा अलिखित नियम मोडून मार्च मध्येच पाकिस्तानी लोकांनी आपली फौज पाठवून या रस्त्यावर कब्जा करायचा केलेला हा कट फार भयंकर होता. त्यामुळे आता जागो—जागी रस्त्याचे रक्षण करणारे जवान दिसतात, especially प्रत्येक अवघड वळणावर, प्रत्येक Bridge च्या आधी आणि नंतर थंडी—वारा—पाऊस यांची पर्वा न करतो सजगपणे. येणारा convoy या सर्वांचे ration etc. आणतो. आपण आणि आपली सीमा यांचे रक्षण करणा—या या जवानांसाठी हा convoy रोज येणे जरूरी आहे. दु. 2ला सोनमर्ग to कारगिल आणि रात्री 1ला कारगिल to श्रीनगर.

हे जवान, त्यांचे आयुष्य 99चे युद्ध या सर्वांचा विचार करतच रात्री कारगिलला पोहोचलो.

9—9.30ला हॉटेल शोधणे सोपे नव्हते. 4—5 ठिकाणी शोधल्यावर कुठंतरी—कशीतरी रात्री पुरती जागा मिळाली. एक छोटी single room आणि एक double room no extra bed available. मग जेवणाच्या शोधात. 4—5 ठिकाणी चौकशी केल्यावर या सगळ्या काश्मिरींच्या गावांत एक छोटेसे सरदारजीचे हॉटेल मिळाले, रात्री 10.30 वाजता.

Apparantly अनपेक्षितपणे इतके सारे tourist – almost 1000 – both ways – Leh to Shrinagar & otherway आल्यामुळे सर्वांकडचे तयार जेवण संपले म्हणे. यानेपण रात्री

नव्याने भाजी–भात बनवल्याने आम्हाला छान ताजे जेवण मिळाले. वरण–भात, कॉलिफ्लॉवरची भाजी मनासारखे जेवण मिळाल्याने आनंद एकदम खूष !

पोटभर जेवून हॉटेलवर परत आलो. बाकी स्वच्छता ठीकच ठीक पण एवढ्या थंडीत उबदार रजई असल्याने झोप मात्र लागली चांगली.

**05-06-2005**

कालच्या अनुभवानंतर लेहला तरी दिवसा उजेडी पोहोचू असा विचार करून सकाळी लवकर निघालो. ड्रायव्हरला पण घाई होती कारण आम्हाला तिथे सोडून रात्रीच्या आंत परत यायचा त्याचा विचार होता. रात्रीच्या convoy बरोबर परत जाऊन उद्या पुन्हा येण्यासाठी.

डोंगराच्या पायथ्याशी 'सुरू' नदीच्या काठाशी वसलेले साधारण तालुका level चे कारगिल हे एक गांव आहे. रात्री उशीर झाल्यामुळे गाव विशेष बघता आले नाही. राहायला जागा बघण्याच्या दृष्टिने driver ने एक दोन घरं दाखवली होती तेच काय ते local लोकांचे जवळून दर्शन. सकाळी हॉटेल मधून बाहेर पडल्यावर बाहेर पडे पर्यंत गावाचे थोडे दर्शन झाले. डोंगरा पली कडून आलेल्या बॉब गोळ्याने जखमी झालेली काही घरे पण पाहिली.



थोडं पुढे गेल्यावर उंचावरून वरचं जुनं आणि नदी काठा जवळचं खालचं नवं वाढलेलं असे गावाचे दोन भाग दिसतात. ही सुरू नदी आणि लेह कडून झरकार मधून येणारी नदी आणि एक मोठा stream एकत्र मिळून कारगिलच्या आस–पास turn होऊन पुढे पाकिस्तान मध्ये जातात म्हणे. लोकल लोकं नदीला 'दरिया' म्हणतात जसे 'दरिया सुरू' etc.

कारगिल सोडल्यानंतर निसर्ग आणि माणसं दोन्ही एकदम बदलून जातात. कारगिलनंतर 20–25 कि.मी. वरचं पुढचं गांव मूलबेक 40–50 घरांचं छोटं गाव. उतरती छपरं सोडून आता धाब्याची घरं दिसू लागतात. बर्फ पडतो थोडा फार पण वारा इतकां असतो की अशीचं छपरं लागतात म्हणे. इतक्या छोट्या गावात मातीच्या घरांमध्ये गावाच्या मध्यावर बांधलेली चकचकीत मोठ्ठी (relatively) नवी मशीद थोडी खटकली. धर्मस्थलाचं कवच पांघरून चालणाऱ्या आतंकवादी कारवायांची आठवण झाली.

मशिदीमध्ये घुसून, लपून या छोट्याश्या गावावर कब्जा करायला 7–8 पेक्षा जास्त बंदूकधारी आतंकवाद्याची गरजच नाही.

अफगाणिस्तान मध्ये सगळी तबाही झाल्यानंतर लोकांना जगणच मुष्किल झालं. त्यांना काश्मिरच्या गावांमध्ये चांगली जागा मिळाली. आतंकवादी शिबिरांत training घेऊन काश्मिरच्या जंगलात अलगद शिरलेले हे लोकं कधी बंदूकीचा कधी भारतद्वेषाचा आधार घेऊन गावा–गावांमध्ये establish होऊन गेले आहेत. केवळ army चा सहारा आहे म्हणून ते गप्प आहेत. सध्या असं वाटलं. आमचा टॅक्सी ड्रायव्हर पण त्यांच्या पैकीच एक होता का ?

युद्धा विषयी त्याची बोलायची पद्धत, जवानांविषयी arrogance पाकिस्तानमध्ये सगळं पाणी जातं हे सांगायचा त्याचा आवेश सगळच मला शंकास्पद वाटू लागलं. का माझी नजरच दूषित होती त्याला बघायची ?

कितीही मनाला समजावलं तरी शफीच्या आणि त्याच्या बोलण्याच्या tone मधला फरक दुर्लक्षित करता येत नव्हता- Well ! आणखी पुढे जावे तो पुन्हा माणसं सोडून निसर्गाने मन मोहून घेतले. आता रस्ता थोडा चढ थोडा उतार असा होता. मागे बर्फाच्छादित शिखरं आणि आजू बाजूला लडाखमधल्या typical वाळवंटी टेकड्या बिना खडकांच्या संपूर्ण रेती सारख्या दिसणा–या आणि off course भव्य. भव्यता हे हिमालयाचेच रूप. तुम्ही तिथे ज्या स्वरूपात बघता ते – ते हिमालयाचे रूप तुमचे डोळे दिपवून टाकते. या वाळवंटातल्या टेकड्यांचीच अनेक मनोहारी रूपं आम्हाला नंतर लेह भोवती दिसली. एकच होतं आडोशाला कुठेच झाडं नसल्यामुळे वाटेत थांबायचं म्हटलं की पंचाईत. बरोबरच्या माणसांच्या सभ्यतेवरच आपला भरोसा ठेवायचा झालं.



पुरेसं पाणी आणि अन्न ठेवा वाटेत काही मिळणार नाही. कारगिलला भेटलेल्या चंदीगडच्या सरदारजींनी दिलेला सल्ला आठवत आम्ही पुढे चाललो होतो. लेहच्या प्रेमात पडून दुस–यांदा तिथं जाणारी – स्वतःच्याच वाहनांनी दोन किंवा चार चाकी – दिल्ली–पंजाबची अनेक माणसं आपल्याला या प्रवासांत भेटतात.

त्यानंतर मात्र मला वेळोवेळी त्रास देणारा माझा motion sickness सुरू झाला आणि गोळी खाऊन मी झोपून गेले. मध्येच कुठेतरी चहाला थांबलो, मी झोपलेच होते.

एकदम हवा बदलून वादळी वारे आणि पाऊस सुरू झाला – पाऊस कसला – गाराच होत्या – त्या थंडीत पाणी गोठणारच होते – आणखी पुढे गेल्यावर थोडासा snow fall चालू होते. snow fall आणि hail storm एकामागे एक पाहून आनंदला खूप मजा आली. आम्हाला सोडून द्रासला परत येण्याची काळजी असल्याने ड्रायव्हरपण गाडी पळवायच्या मागे होता.

मधे कुठे तरी लामायारू गाव येऊन गेले जिथे प्रसिद्ध monastry आहे.

आम्ही खालत्से गावाला जेवलो. इथून सुरवात झाली 'त्से' नावांच्या गावाची आणि थुकपा आणि मोमोची मनालीला trekking च्या वेळेस खाल्लेल्या या पदार्थांची सगळे वाटच पाहात होते.

तिथेच आम्ही typical बुद्ध मणे/मनेपण पाहिली लोकांना त्याला फिरवताना पाहून हे काय आहे असा विचार करत गाडीत बसलो आणि वळणावळणाच्या रस्त्याने पुन्हा लेहकडे निघालो.

कारगिलच्या सरदारजीने आवर्जून सांगितले म्हणून पत्थरसाहेब गुरुद्वा-यापाशी टॅक्सी थांबवायला लावली नाहीतर टॅक्सीवाला चालला होता पळवत. थोडे घाईने दर्शन घेतले. जागृत देवस्थाना सारखी याची पण दंतकथा तिथे लिहिलेली होती – गुरूनानक साहेबांनी केलेल्या राक्षसाच्या मनपरिवर्तनाची. इथला लंगर आर्मीचे लोकच चालवतात म्हणे. आम्ही बाहेर पडत असताना जवानांची एक तुकडी दर्शनासाठी आत शिरत होती.

आता लेह 25 कि.मी. दूर होते. आम्ही तिथे पोचायची उत्सुकतेने वाट पाहात होतो.

गावात शिरताना पहिल्यांदा army establishment, विमानतळ, tourist information centre असं बघत गावात शिरलो. बातम्यांमधे लेह festival च्या झलकीमध्ये T.V. वर पाहिलेल्या गावात आम्ही शिरत होतो. आता हॉटेल शोधायचे होते. Internet वर खूप सारी Hotel ची नांवं दिसल्याने आणि पूर्वी तिकडे जाऊन आलेल्या कोणी सल्ला दिल्यामुळे आम्ही इंदूरहून निघताना आधी Booking केले नव्हते.



Taxi stand भरलेला होता म्हणून रस्त्याच्या बाजूला taxi उभी करून नितिन, फैयाज (लडाखी जवान सुटीवर निघालेला) आणि शफी जागा शोधायला निघाले. Taxi वाला didn't seem happy about it. पोलिसनेपण रस्त्यावर गाडी उभी करू नको म्हणून

हटकले. लेहच्या लोकल आणि बाहेरून तिथे येणा–या taxi वाल्यांमधे फारसे सख्य नसावे. 5–10 मिनिटातच हे लोकं हात हलवत परत आले. मग पुढच्या स्टॅंडवर सामान उतरवून टॅक्सीवाल्याला मोकळे करायचे ठरले. टॅक्सी उभी राहिल्यावर त्याला पैसे दे असं सांगून आणि शफीला आमच्या सोबत ठेवून नितिन आणि फैयाज हॉटेल शोधायला निघाले.

टॅक्सीवाल्याला बहुधा माझ्याकडून पैसे मिळतील याची अपेक्षा नव्हती. त्याने 'गेला का मला सोडून तसाच' वगैरे बडबड करायला सुरवात केली. भराभरा सामान उतरवून दिले. इतका वेळ रस्त्यामधे भेटलेल्या बाकीच्या टॅक्सीवाल्यांना नम्रपणे अभिवादन करणारा हाच का तो माणूस असा मला प्रश्न पडला. 'घे बाबा पैसे आणि जा एकदाचा' असे वाटले.

मग नितिन वगैरे हॉटेल शोधून येईपर्यंत आम्ही बसलो सामानाजवळ. शफीशी थोड्या गप्पा झाल्या. आजू–बाजूला माणसं, गावपण बघत होतो.

सडक मार्गाने (थल मार्गाने) लेहला गेल्यावर जातानाच आपण इतके निसर्ग सौंदर्य पाहिले असते की एकदम पोहोचल्या–पोहोचल्या थोडा अपेक्षा भंग होतो पण तिथे राहिलं आणि फिरलं की त्याच टेकड्या अधिकाधिक सुंदर दिसू लागतात. नितिन आणि फैयाजला थोडा वेळ लागला यायला त्यावेळांत शफीशी गप्पा झाल्या.

शफी : काश्मिरमध्ये राहाणा–या देशभक्त मुस्लिमांचं (its not an oxymoron) प्रतीक वाटला. स्वतः फौजी असल्याचा त्याला अत्यंत अभिमान होता आणि फौजे विषयी आत्मीयता पण. काश्मिरी पंडित निर्वासित झाल्याचे त्याला दुःख होते. पण काश्मिर सोडून जाण्याची त्यांनी फार घाई केली असे पण त्याला वाटत होते. तिथेच डटून राहिले असते तर स्थानीय रहिवाश्यांच्या हातून काश्मिर गेले नसते. आतंकवाद्यांनी खरंतर लोकल मुस्लिमांनापण सोडले नाही. पण त्याच्या तितक्या बात्म्या पसरल्या नाही. एक दोन मोठे नरसंहार झाले ते राजकीय पाठबळाशिवाय होऊ शकणार नाहीत असेही त्यांना वाटते. तो आणि त्याचे दोन्ही भाऊ तिघे सैन्यामध्ये आहे. शफी स्वतः बटालिक sector मध्ये युद्धात सहभागी होता. घुसपैठ केलेल्या पाकिस्तानी सेनेचे खबरे गावागावात होते असं म्हणताना तो कधी टॅक्सीतून खाली उतरलेल्या ड्रायव्हर कडे नजर टाकत असे. आधी पैशाची गरज म्हणून army join केल्यावर हळू–हळू त्यांना आतंकवादाचे खरे स्वरूप कळले असावे असे वाटले.

Actual युद्ध करताना भीति नाही का वाटत ? न राहवून बराच वेळ थांबवलेला माझा प्रश्न 'सगळे बरोबर असताना कसली भीति ? जीतने के बाद हम मनाली रोड से आए तो लोगों ने हम पर फूल बरसाए' विजयाच्या आठवणीने त्याचे डोळे तेव्हांही चमकले.

लडारवी लोकं कसे fashionable राहातात, चंदीगडच्या शाळांमध्ये मुलांना शिकायला पाठवतात हे सगळं कसं परवडतं त्याना ? असं त्याल वाटत होतं.

आतंकवादामुळे local काश्मिरी लोकांचं सगळच आयुष्य बदलून गेलं. स्वतः निर्वासित झाल्यानंतर just for survival दुस–यांना बेघर करताना हे तालिबानी घर सोडण्याचं दुःख नाही समजू शकले ? पण त्यांना थारा देणारे local काश्मिरी पण दोषी नाहीत का ?

थोड्या वेळांत नितिन अन् फैयाज आले. तोवर मी शफीला त्यांना शोधायला पाठवले होते.

If not on peak पण बरेच tourist आले असल्याने हॉटेल शोधायला थोडा वेळ लागला. Tourist gsp main income चे साधन असल्याने ब–याच लोकांनी खाली घर आणि वर राहायच्या खोल्या अशी guest house आहेत. आम्ही जिथे राहिलो तो माणूस श्री. बोध 'airlines मध्ये security officer आहे.

स्वच्छ खोल्या आणि जरूरीपुरते सर्व सामान अशी व्यवस्था होती. राहायची चांगली सोय झाल्यावर आमही शफी अन् फैयाजचा निरोप घेतला.

ब–यापैकी थकलेले असल्याने त्यादिवशी बस जेवून झोपायचे एवढेच उद्दीष्ट डोळ्यांसमोर होते. Guest House मध्ये घरगुती जेवण मिळाल्याने छान वाटले.

सकाळीच tourist reception centre वर जावे आणि पुढचा programme ठरवावा असा विचार होतो. पण श्री.बोध स्वतः official travel agent पण असल्याने आमचे काम सोपे झाले.

पहिल्या दिवशी उंचावरच्या हवामानाची सवय होऊ द्यावी या दृष्टिने local sight seeing करायचे ठरले.

रात्री हवा पुन्हा थोडी ढगाळ होऊ लागली होती, थोडा पाऊस आणि वारे चांगलीच थंडी वाढली होती. इंदूरच्या 42 डिग्री तापमानाची आठवण काढत आम्ही मस्तपैकी रजई पांघरून झोपलो.

**06-06-2005**

आजचा दिवस लेह आणि आजू–बाजूचा परिसर बघायचा होता. मुख्यतः बुद्ध धर्मीच लोक असल्यामुळे नव्या आणि जुन्या छोट्या–मोठ्या monastries हेच मुख्य sight seening. सहसा वेगवेगळ्या टेकड्यांवर या बसलेल्या दिसतात. एक मुख्य मंदिर जिथे गौतम बुद्धांची मूर्ती सुंदरसे रंगी–बेरंगी decoration दरवाज्यापासून आंत पर्यंत wood carving आणि wall painting़ त्या मध्ये समोर देवाला वाहिलेले पाणी वाट्यांमध्ये ठेवलेले आणि काही लांब स्कार्फ साराखे जरीचे कपडे बांधून ठेवलेले. समोर नक्षीदार टेबलावर वेगवेगळे मंत्र म्हणनारा लामा. असे साधारण दृष्य असते. बुद्ध लोकं मूर्तीवर हळदी–कुंकू वाहात नाहीत. पाण्याचा नैवेद्य यासाठी की ते आणायला तुम्ही पैसे खर्च करत नाही. काय वाहता यापेक्षा शुद्ध मनाने आणि श्रद्धेने अर्पण करा. हा त्यामागचा हेतू असे. आम्हाला कोणी सांगितले देवळांमध्ये तेलाचे दिवे लावतात. देवळा शेजारी एका छोट्या खोलीत तेल जमा करायचे तिथे एक–दोन लामा दिवे लावताना दिसत होते. भिंतींवरती वेगवेगळ्या गोष्टींची (जुन्या कथा) आणि पूजांची चित्र काढलेली असतात. जुन्या काळची चित्रं actual stones आणि झाडांच्या, सोन्या–चांदीच्या वर्खाच्या नैसर्गिक रंगांपासून बनलेली असतात. त्यांना नुकसान होऊ नये म्हणून देवळांत फ्लॅश फोटोग्राफीला परवानगी नसते. परंपरागत चित्रं काढणं सर्वांनाच जमत नाही. त्याचे पिढ्यान्‌पिढ्या काम करणारे चित्रकार असतात. या चित्रंना Thanka Paintings म्हणतात. Monastries मध्ये शिकणारे, शिकवणारे इ. छोटे–मोठे लामा दिसतात.

हो आणि मुख्य म्हणजे देवळा बाहेरच्या 'माने' किंवा 'माणे' लाकडाच्या दांड्यावरच्या गोल–गोल फिरणा–या छोट्या–मोठ्या 'माने' – छोट्या ड्रम सारख्या प™याच्या 'माने' सगळीकडे दिसतात. त्या प™यावर मंत्र लिहिलेले असतात. देवळात जाण्यापूर्वी आपण घंटा वाजवतो तसे या 'माणे' फिरवून लोक आत जातात. त्या फिरवताना तोंडाने पण मंत्र म्हणतात. देवळा बाहेर छोट्या ओळीत आणि रस्त्या–रस्त्यावर पण छोट्या उघड्या देवळांमधे पण नुसतीच मोठी 'माणे' दिसते – देवाशिवाय. पूर्वीच्या काळी गुन्हेगारांना शिक्षा म्हणून इतक्या दिवसांच्या आत इतक्या 'माणे' बनवायची शिक्षा दिली जात असे.

घरी जप करायला हातात गोल फिरवायच्या खुळखुळ्यासारख्या माणे पण मिळतात. त्यावर यातर वर मंत्र लिहिलेले असतात नाहीतर कागदावर.

एकूण मंत्रांचे म्हत्व आहे. घराघरांवर काही विशेष कार्य केल्यावर रंगी–बेरंगी पताकांच्या माळा दिसतात त्यावर मंत्र लिहिलेले असतात. काही पुलांनासुद्धा या पताका लावलेल्या दिसल्या (दैवी रक्षण म्हणून).

हेमिस monastry ही तिथली सर्वात मोठी monastry. ती लेह–मनाली रस्त्यावर येते. लेह बाहेर पडताना समोर typical वाळ्वंटाचे आणि oasis चे लेहच्या निसर्गाचे सुंदर निसर्गदृष्य दिसते. वाटे मध्ये 'थिगत्से' monastry पण आहे. त्यामधील मैत्रेयी बुद्धाची मूर्ती प्रसिद्ध आहे. आम्ही गेलो तेव्हां कुठल्या कानडी सिनेमाचे shooting चालू होते. 'थिगत्से' च्या छतावरून आजू–बाजूचे विहंगम दृष्य बघता येते. त्यानंतर तो area पाहिला तिथे लक्ष्य सिनेमाचे shooting झाले. तितकाच किंवा त्याहूनही सुंदर दिसत होता तो भाग. या रस्त्यावर बाजूने सिंधू नदी वाहताना दिसते.

ऊन पावसाचा खो–खो चालू होता. पावसाळी हवेमुळे थंडी पण वाढली होती. वाटेत आमच्या जीपची एका मारूती गाडीशी थोडी टक्कर झाली. टॅक्सी ड्रायव्हरने सभ्य पणे गाडी उभी करून काय झाले बघायला खाली उतरला. आम्ही आपले बघत होतो. लडाखी लोकं काय करतात ते. आवाज न चढवता आपापसांत काही बोलणे चालू होते. गाडी चालवणारा एक लामाच होता. जाणा–या एक–दोन गाड्या थांबल्या, बोलणे झाले, गाड्या गेल्या. 5–10 मिनिटांनंतर ड्रायव्हर परत आला. इच्छा असूनही सामोपचारासाठी मधे पडणे आम्हाला योग्य वाटले नाही. हेमिस monastry पाहून परतीच्या वाटेवर शे पॅलेस आहे. तिथे भगवान बुद्धांची सुवर्णवर्खाने मढवलेली मूर्ती आहे. वरती जुना राजवाडा होता म्हणे पणे आता त्याचे काही अवशेषच बाकी आहेत. त्यानंतरचा राजाचा राजवाडा म्हणजे लेह पॅलेस. तो पण आता जुना झाला. Typical लाकडी खिडक्यांच्या हा मोठा राजवाडा, दगड–मातीच्या भिंती आणि बांबूची छपरं, छोट्या–मोठ्या दरवाजांमधून फिरताना रस्ता हरवून जातो. भिंती बघताना मला लहानपणी गावामध्ये पाहिलेल्या आजोबांच्या घराची आठवण झाली. लेह पॅलेस पण तसा मोडकळीला आला आहे. सध्ययाचे राजे स्टॉक पॅलेसमध्ये राहातात म्हणे. तिथे काही खोल्यांमध्ये museum आहे. जुने फोटो, भांडी, देवघर, जूनी नैसर्गिक रंगांनी बनवलेली 'थांका पेंटिंग्स' आणि राजा–राणीचे दागिने पाहायला मिळाली. लद्‌दाखी बायका सोन्या–चांदीचे दागिने विशेष घालत नाहीत. नीलमणी (Turcoisest) आणि पोवळ्याचे दागिने मुख्यतः वापरतात. कापडावर turcosie stonè लावलेला केसावरचा शिरटोप मुलींना लग्नांत आई–वडिलांकडून मिळतो. हा शिरटोप, कानातले मोठे वेल आणि गळ्यातल्या माळा हे त्यांचे दागिने. सध्याच्या राजाची आई पूर्वाश्रमीची मनालीची राजकन्या पूर्वीची लेहमधली कॉंग्रेसची सांसद होती. आता मात्र वेगळ्या लद्‌दाखची मागणी करणारा कुणी अपक्ष तिथला सांसद आहे म्हणे. सध्याचा राजा दिल्लीला कुठल्या scientific institute मध्ये काम करतो.

जेवायची वेळ झाली. गावामध्ये जेवायला थांबलो. थुकपा आणि मोमोची छोटी–मोठी दुकानं शोधली. काही ठिकाणी जेवण संपून गेले होते. लडाखी महिन्याच्या

कुठल्या particular तिथिला तिथल्या हॉटेल्समध्ये मांसाहारी जेवण बनवत नाही. मोमो म्हणजे मैद्याच्या पापडी मध्ये सारण भरून (सामान्यतः मटण आणि भाजीचे पण) वाफेवर शिजवलेला करंजी सारख्या आकाराचा पदार्थ आणि थुकपा म्हणजे सूपमध्ये शिजवून वेगवेगळ्या भाज्या / मटण टाकलेल्या हाका नूडल्स सारखा पदार्थ.



पहाडी भागामुळे मुख्यतः उकडलेलेच अन्न खातात. उन्हाळ्यांत तरी भाज्या मिळतात, थंडीमध्ये तर बटाट्याशिवाय काही मिळत नाही. त्यामुळे मांसाहाराला पर्याय नाही. मसाले अगदी कमी पण साध्याच पद्धतीनी बनवलेले जेवण चविष्ट चवदार असते. आपल्याला ते थोडे कच्चट / कमी शिजवलेले वाटते.

जेवल्यानंतर काली मंदिर, हॉल ऑफ फेम, आणि शांती स्तूप पाहिला. काली मंदिरमध्ये खाली monastry आणि वरती अनेक हात असलेली कालीची मूर्ती आहे. या मूर्त्यांना चेहरे दिसत नाहीत. ही देवीची मूर्ती नसून एका Buddhist Protector ची आहे पण आर्मीच्या camp च्या अगदी जवळ आहे तर आर्मीचे लोक त्याला कालीमाताच म्हणतात असे तिथल्या लोकांचे म्हणणे.

त्याच्याजवळ आहे Hall of Fame. लेह–लद्दाखमध्ये झालेल्या वेगवेगळ्या युद्धांची माहिती जोरावरसिंग पासून ते कारगिल पर्यंत, वेगवेगळी शस्त्रं, वर्तमानपत्रांची कात्रणं आणि सियाचीनमध्ये वापरली जाणारी सामग्री, कारगिलमध्ये पाकिस्तानी बंकर्समध्ये सापडलेली शस्त्रास्त्रं, फोटो पाहायला मिळतात. इतिहासांत आणखी किती युद्धं लिहिली जाणार कुणास ठाऊक ?

मग शांति स्तूप पाहायला गेलो. जापानी लोकांनी एका उंच टेकडीवर बनवलेला हा सुंदर स्तूप. इथून पूर्ण लेह चहूँ बाजूंनी पाहायला मिळते.

हळू–हळू अंधार पडू लागला होता. पायपण थोडे बोलू लागले होते, वा–यावबरोबर गारवापण येऊ लागला होता. आम्ही हॉटेलवर परत आलो.

आजच्या पावसाबरोबर सगळी कडे snow fall झाल्यामुळे Pongongtso (lake Pongongtso) ला जाणारा रस्ता बंद झाल्याची बातमी आमहाला कळली. उद्या खूप ऊन पडून परवापर्यंत रस्ता रिकामा व्हावा अशी आशा करत आम्ही झोपलो. दुस–या दिवशी खरदुंगला पास ला जायचे ठरले.

**07-06-2005**

'खरदुंगला' ला जाण्याच्या दिवस आणि वेळही – army convoy P;k movement प्रमाणे ठरवावी लागते. तिथे एक दिवस convoy जातो आण दुस–या दिवशी येतो. जातो

त्या दिवशी जाणे चांगले कारण मग लवकर जाऊन परत येता येते. त्यापलीकडे उतरून गेल्यानंतर नुब्रा व्हॅली आहे. तिथे दो उंचवटे असलेले उंट दिसतात आणि सुंदर फूल झाडं. रात्री तिथे राहून दुसऱ्या दिवशी परत येता येते. पण तसं केलं तर एकच दिवस उरला असता आणि परत



जायच्या आदल्या दिवशी Pongongtso लेकला जाऊन यायचा programme ठरवणे जरा risky होते in the sense बदलत्या हवामानामुळे कधी snow fall होईल आणि कधी रस्ता बंद होईल याचा नेम नाही. खरदुंगला पास नंतर 10–12 कि.मी. वरच पाकिस्तान बॉर्डर असल्यामुळे snow fall झाला तरी काही तासातच आर्मीचे तैनात शिपाई आणि यंत्र सामग्री (बुलडोझर्स इ.) र स्ता चालू करतात. चीन बरोबर त्यामानाने शांतिचे संबंध असल्याने पॅगॉंग लेकचा रस्ता इतक्या तत्परतेने चालू होईलच असे नाही.

एकदा विश्वासघात करून पाकिस्तानी सैन्याने भारतीय आर्मीला कायमच्याच ड्यूटीला लावून दिलय. ते पण इतक्या दुर्गम भागात 'K' top (खरदुंगला top आर्मीवाल्यांच्या भाषेत) is supposed to be world's highest motorable road at hight of 18400 feet. गरज असेल की मार्ग निघेल नाहीतर इतक्या उंचीवर बनलेला इतका मोठा आणि इतका चांगला रस्ता. Gradual gradients no acute bends – no potholes inspite of weather conditions. मला उगीचच 50 वर्षातही broad न बनलेला इंदूर–खांडवा रेल्वे मार्ग आठवला.

आर्मीवाल्यांमधल्या 1/10 ही प्रामाणिकपणा आणि शिस्त dedication नागरी प्रशासनामध्ये उतरला तर ?

'चागलास' ओॲसिसच्या बाजूने निघून आमची जीप खरदुंगला पास चढू लागली होती. एकदम समोरचा टॅक्सीवाला थांबला. का थांबला असावा ? काही obstacle तर दिसत नव्हते. तेवढ्यात त्याने वरच्या टेकडीकडे खूण केली. टेकडीच्या वरच्या भागात एक सुंदरसे हरिण दिमाखात उभे होते आमच्याकडे पाहात. गाड्या उभ्या होत्या तोवर ते पण उभे होते पण फोटो काढायला म्हणून जसा गाडीचा दरवाजा उघडला ते लपून गेले. थोड्या वेळच्या लपालपीनंतर मोठ्या मुष्किलीने एक फोटो मिळाला. मग आम्ही आमच्या आणि ते त्याच्या रस्त्याने चालू लागले. इतक्या उंचावर काही हिरवळ अन् आडोसा नसताना यांना वाढवणाऱ्या निसर्गाची कमाल आहे. परत आल्यानंतर एक–दोन दिवसांनी Times of India मध्ये हिमालयातल्या हरणांच्या प्रजाती exinet होण्याच्या मार्गावर

असल्याची बातमी वाचली. नुब्रा व्हॅलीकडे जाताना एकदाच snow leopard ही पाहिल्याचे आमच्या टॅक्सीवाल्याने सांगितले. थोड्याच अंतरावर हळू–हळू आजू–बाजूला बर्फाचा सडा पडलेला दिसत होता म्हणजे मधे–मधे जमीनपण दिसत होती पण इतका वेळ आकाशांत चमकणारा सूर्य एकदम झाकोळू लागला होता.

खरंतर हॉटेलवरनं निघताना आकाश ब–यापैकी निरभ्र होते. त्यामुळे आज ऊन पडून उद्या पर्यं पॉगॉगचा रस्ता चालू होईल अशी आम्हाला आशा वाटू लागली होती. पण तसं होईल असं आता दिसत नव्हतं. ठीक आहे आत्ता तर चला. चांगला मोकळा रस्ता आहे. आजतर 30–40 कि.मी. च जायचे आहे. असा विचार करत होतो. पण इतक्या उंचावरच्या पहाडावरचे 30–40 कि.मी काय असतात हे अजून समजायचे होते आम्हाला.



रस्ता पुढे जात होता. वरच्या level वर आम्हाला पुढे जाणारी वाहने, army चा convoy आणि बर्फाच्छादित पर्वत दिसत होते. आता आकाश अजून भरून आजे होते थोडा–थोडा पाऊस म्हणजे snow fall चालू झाला होता. आणखी पुढे गेल्यावर गाड्या थांबलेल्या दिसल्या. आम्ही पण त्यांच्या मागे जाऊन थांबलो. खालून दिसलेल्या army च्या गाड्या आमच्या पुढे उभ्या होत्या. एक–एक करत हळू–हळू सगळे खाली उतरू लागले. कुणी घाईने कुणी सावकाश. पुढे मागे चालून काय चाललेयं यायची चौकशी करता आणि रस्ता खराब म्हणून army वाल्यांनी थांबवलयं म्हणे. 'आर्मीवाले उगाचच थांबवतात कारण नसताना' वगैरे remark चालू होते. पण रस्ता primarily आर्मीसाठीच आहे हे सर्वजण विसरले होते का ? बर्फावर गाडी घसरू शकते म्हणूनच थांबवले होते ना. घसरू नये म्हणून आर्मीच्या प्रत्येक ट्रकच्या चाकांमध्ये साखळ्या लावलेल्या होत्या. स्वित्झर्लंच्या cog wheel train आणि alps ची आठवण आली. एव्हांना पाऊस भुर–भुर चालू होता. थंडी चांगलीच जाणवू लागली होती. पण snow फारच छान होता. Relatively कमी trafic असल्याने झोजिलाच्या मानाने अगदी पांढरा स्वच्छ आणि soft snow होता आणि नुकत्याच झालेल्या snow fall चा होता ना अगदी fresh. त्यामुळे थोडाच होता.

थोड्या वेळाने traffic सुरू झाला. Civilian taxi ना साइडने पुढे काढून मागून convoy येणार होता.

जिथे पण गाड्या थांबतील तिथे local taxi वाले एकीकडे आणि army वाले दूसरीकडे आणि मधे इकडे–तिकडे फिरणारे tourist असे group होत. Army वाल्यांचे काम व्यवस्थित शिस्तिचे. पण taxi वाल्यांच्या म्हणण्याप्रमाणे थोडे–थोडे दिवस posting

होत असल्याने army चे ड्रायव्हर आमच्या सारखे अनुभवी नसतात म्हणून सारखे थांबतात. पण this was a very heathy encounter त्यात कुठेही कटुता नव्हती. जसेजसे वर जाऊ लागलो तसे बर्फाचे प्रमाण वाढू लागले. झाडे नसताना पण दिसणारे पर्वचाचे सौंदर्य काही वेगळेच होते. बर्फाचा thikness ही वाढला होता आणि त्याबरोबर थंडीपण.

आता थोडा sickness जाणवू लागला as usual सगळ्यात पहिल मला. पण आजू–बाजूच्या सृष्टि सौंदर्यामध्ये थोडे दुर्लक्ष करू शकत होते. मधे एक amy चे igloo आणि बुलडोझर ठेवलेले दिसले. एका वळणावर सायकलवर जाणारे दोन 'गोरे' प्रवासी दिसले. यांची पण कमाल आहे पाठीवर racksack लावून सगळ्या सामानासकट निर्धास्तपणे एक India चे tourist guide बरोबर ठेवून हे लोकं हिमालयात फिरताना भेटतात.

आणखी पुढे जाऊन गाड्या पुन्हा थांबल्या. इथे आजू–बाजूला बराच बर्फ होता. जमीन पूर्णतः बर्फाने झाकून जवळ–जवळ 10–12″ जाडीचा थर जमला होता. पायाने वा हाताने खाचा करून बर्फात कसे चढायचे ते एका guide ने दाखवल्यावर सर्वच लहान थोरांना उत्साह आला.



थंडीला घाबरून टॅक्सीच्या आत बसलेली मी पण हळूच बाहेर आले. रवि, आनंद 10–15 फूट वर चढले होते. मी पण चढून पाहिले पण 8–10 फूटापर्यंत चढले तरी दमछाक होत होती. सर्वांनी बर्फात बरेच खेळून घेतले. ट्रफिक पुन्हा चालू झाला. आता मात्र डोकेदुखी हळू–हळू वाढू लागली. जरावेळाने आनंदपण कसंतरी होतयं म्हणून थोडी तकार करू लागला. सकाळपासून काही खाल्ले नाही थंडी आहे थोडं खाल्लं तर बरं वाटेल म्हणून एखदी बाकरवडी खाल्ली पण बरं वाटेना.

खरदुंगला top आता जवळच आहे टॅक्सी ड्रायव्हर सांगत होते. पण तेवढावेळ काढणं पण थोडं अवघड वाटू लागलं.

'K' top अगदी नजरेच्या टप्प्यांत आल्यावर गाड्या पुन्हा थांबल्या. जागा कमी, येणा–या गाड्या येतच होत्या, थंडी पण होती. Height आणि गाड्यांच्या गर्दीमुळे निघणारा exhaust यामुळे त्रस वाढला. खूपच restless वाटत होतं. आनंदला त्रसाबरोबर राग पण येऊ लागला होता का मला इथं आणलं म्हणून. मला पण त्रस होता त्यामुळे त्याची समजूत घालण्याच्या परिस्थितीत नव्हते. त्याची तडतड पाहून टॅक्सीवाला पण थोडा घाबरला होतो. पण घाबरण्यासारखे काही नव्हते हे आम्हालापण समजत होते. आमच्या बरोबर लेहहून आमच्याच guest house मधून पुण्याची एक family होती. वरती army च्या tent मध्ये oxygen supply आहे तिथे जाऊन या जरा ते

सर्वांनाच मदत करतात असं त्यांनी सांगितलं. मी आनंदला घेऊन वर गेले. तेवढे 20–25 फूट चालताना धाप लागत होती थोडी. एका O2 cylinder ला face mask जोडलेला होता. आधी आनंद मग मी O2 inhale केला. किती फायदा झाला महीत नाही. आम्ही पुन्हा टॅक्सीमध्ये येऊन बसलो.

आजू–बाजूला मजेत फिरणा–या लोकांचा थोडा हेवा वाटत होता. नितिन, रविला पण म्हटलं होतं फिरून या म्हणून. इद्दारा मिळाल्या द्दिवाय परतीचा traffic सुरू होणार नव्हतं. अजून आर्मीच्या 3–4 गाड्या येणं बाकी होतं.

आल्या एकदाच्या येणा–या गाड्या आणि निघालो आम्ही परत. आनंदच्या जीवात जीव आला. तो खूपच घाबरून गेला होता या अनुभवाने. थोडं खाली येताच वातावरणातला फरक जाणवू लागला आणि restlessness कमी झाला होता. पण sickness एकदा सुरू झाला की एकदम ठीक होत नाही. मी नेहमीप्रमाणे झोपून गेले. मधल्या काळांत ब–यापैकी snow fall झाला होता त्यामुळे जाताना विरळ दिसलेला बर्फ आता पूर्ण जमीनीला झाकून टाकत होता. परत आल्यावर डोकंदुखीची गोळी खाऊन आम्ही चौधंजणं झोपून गेलो कारण हॉटेलमध्ये पोहोचेपर्यंत रवि आणि नितिनचं डोकं पण दुखायला लागलं होतं.

& 18 &

Mountain sickness चा त्रस झाला हे त्याविषयीचं पूर्ण वेळ लिहिल्यावरून समजलेच असेल.

तितक्याच दुर्गम पाहाडात बनवलेले आहेत पण झोजिला आणि 'K' top इथले निसर्गदृष्य वेगळे दिसले. झोजिला मध्ये तुम्ही नदीच्या बाजूने हिरवळीमध्ये सुरवात करता आणि tree line cross करून वरपर्यंत पोहोचता. इथे मात्र खालचे oasis सोडले तर हिरवा रंग दिसतच नाही (दिसतो तो फक्त आर्मीच्या गाड्या आणि कपड्यांमधे) पण वरच्या भागात ते पण पांढरेच कपडे घालतात. नुसते मातीचे मोठे पहाड आणि त्यावरचा बर्फ पण त्याचेही सौंदर्य वेगळेच असते – कारण पुन्हा एकदा त्यांची भव्यता.

संध्याकाळी उठल्यावर आम्ही बरे झालो पण नितिनला अजूनही त्रस होत होता. म्हणून त्याल घरी ठेऊन मी आणि मुलं 'राज' कॉमिक्स शोधायला निघालो.

रात्री बाहेर निघायची ताकदच नव्हती. आमच्या host कडे order केलेले घरगुती जेवण जेवताना पुन्हा छान वाटले. या episode नंतर आणि वाटेल झालेल्या snow fall नंतर Pgong-Gong Tso (Tso म्हणजे तळे) ला जाण्याचा प्रश्नच संपला.

इथे तीन प्रसिद्ध lakes आहेत TSO म्हणजे lake – जसे TSO MORIRI; PYONGFONG TSO & TSO KERR आम्ही त्यांचे फोटो पाहिले. रेतीच्या पहाडांमधे वसलेली स्वच्छ निळ्याशार पाण्याची ही तळी मानसरोवराची आठवण करून देतात. सुमोरीरी (TSO MORIRI) थोडे कमी उंचीवर असल्याने तिथे सहसा पोहोचायला problem येत नाही पण ते लेहपासून 230 कि.मी. दूर असल्याने दोन दिवसांचा programme असतो म्हणून ते पण cancel. म्हणून आम्ही गावातच फिरायचे ठरवले. रोज टेकडीवर खुणावणारा लेह Palace आणि त्याच्या आणखी वरची monostry असा छोटा treck आम्ही आमच्या host च्या मदतीने plan केला.

**08@09-06-2005**

आतापर्यंत आम्हाला लेह गाव more or less पूर्ण माहित झाले होते. गावाच्या मध्यावरून जाणारा main road आणि आजू–बाजूच्या गल्ल्या. Sight seeing साठी कोणत्याही एका टेकडीवर गेले की सर्व टेकड्यांच्या मधे वसलेले पूर्ण गाव नजरेच्या टप्प्यांत दिसते.

आमचे guest house गावाच्या मुख्य भागाच्या जवळ होते. तिथून tourist information centre थोडे दूर होते पण guest house owner च आमचा tourist guide असल्याने आम्हाला tourist information centre वर जाण्याची गरज पडली नव्हती. Tourist Permit पण त्यानेच आमच्यासाठी बनवून आणले होते. वर rooms आणि खालीच त्यांचे घर होते तिथे जेवलो तेव्हां



त्यांच्या Drawing room मध्येच त्यांनी आम्हाला जेवायला बोलावले होते. सुट्टीसाठी त्यांची मुलगी घरी आली होती. ब–याच लडाखी कुटुंबातली मुलं चंदीगडला शाळेत शिकायला जातात. In general लडाखी लोकं साधे–सरळ वाटले. स्वतःचा मोठेपणा दाखवायचा. दुस–यावर रूवाब करायचा, डामडौल दाखवायचा हे फारसे दिसले नाही. Education विषयी चांगली awarenes / जागरूकता आहे. पैशाचीच पूजा करत नाही आणि कष्टाळू आहेत. कोणतंही काम करायची तयारी आहे आणि एकमेकांविषयी आदरही आहे. दरवर्षी tourist season मध्ये ते एक cook employ करतात पण अजून मनाली रोड चालू न झाल्याने कोणी servents पोचले नाहीएत. अशावेळी जेवण अगदी पोळ्यांपासून सर्व आमची Hostes च स्वतः बनवत होती. तिची मुलगी आणि श्री. बोध

सर्व कामांमध्ये तिची मदत करताना दिसले. एक गावचा लडारवी मुलगा 10–12 वर्षांचा वरकामासाठी होता पण तो रोज नियमित शाळेत जात होता. त्यावेळांत त्याची कामे अंगमो (आमची Hostes) स्वतःच करत असे. त्यांची दूसरी मुलगी पण चंदीगडला ष्टिकते तिला सुट्टी नसल्याने ती आली नव्हती. 11वीं नंतर काय करायचे हे जिगमेतने अजून ठरवले नव्हते. पण मेडिकलला वगैरे जाण्याचे तिच्या मनांतपण होते असे वाटले नाही. आमच्यासाठी जेवण बनवत ते morer or less वरण–भात–भाजी–पोळी असे असे. भाज्यांमध्ये रसदार भाज्या करायची पद्धत असावी. Boiled जेवणच जास्त करून खायची पद्धत आहे. तळण, मसाले फार नसते. उन्हाळ्यांत ब–याच भाज्या मिळतात पण थंडीत non-veg खाण्याला पर्याय नसतो. Airlines मध्ये असल्याने आम्हाला गोष्टी मिळायला फार त्रस होत नाही हे पण त्यांनी मोकळपणाने सांगितले. श्री. बोध मुलीला सोडायला चंदीगडला गेले तेव्हां अंगमोची आई आणि एक Manager त्यांच्या सोबत राहायला आले होते. आजीबाई मात्र अगदी typical लडारवी परिवेषांत होत्या. अंगमो स्वतः किती ष्टिकलेली आहे हे मात्र आम्ही विचारले नाही. तसे ते कामापुरतेच बोलत म्हणजे mainly for information जास्त खोदून विचारणे आम्हालापण बरे वाटले नाही म्हणून एकूण culture विषयी, हुंडा, families, जाती, लग्नं विचारायचे राहून गेले.

एकूण लद्दारवी लोकांना त्यांच्या संस्कृतिचा खूपच अभिमान आहे. बाहेरून येणारे tourist आमच्या संस्कृतिला धक्का पोहोचवतील / पोहोचवतात असे त्यांना वाटते म्हणजे typical नव्या–जुन्याचा संघर्ष. एका तिबेटी restaurent मध्ये गेलो तिथे बरेच लद्दारवी लोकं पण येत होते जेवायला. आमच्या पलीकडच्या टेबलावर दोन मध्यमवर्गीय बायका बसल्या होत्या. एकूण स्त्रियांवर फारष्शी बंधनं नसावीत. ठिकठिकाणी center for women किंवा महिला गृहउद्योगांची handicraft ची दुकानं दिसतात. आमची आजू–बाजूला फिरणारी शोधक नजर पाहून त्यांनी वेटरला आमच्याकडे लक्ष द्यायला सांगितले. एवढ्या सगळ्या हॉटेलमध्ये जवळ–जवळ 13–14 tables तो एकच वेटर होता आणि counter वर बसलेला एक माणूस तो पण मदत करत होता. पण आरडा–ओरडी, चिडाच्डिी न करता सर्व सुरळीत चालू होते.



'कसे वाटले आमचे लद्दारव' त्या दोघींपैकी एका बाईने विचारले. 'खूपच सुंदर आहे. असे वाटते इथेच राहावे इति नितिन. हं पण article 370 है ना । हर कोई चाहता है यहॉं आना हमारी नयी जनरेष्ठान भी फिर वैसे ही काम करने लगती है । वैसे कपड़े पहनना चाहती है । Tourist आते हैं और हमारे बच्चे spoil होते है – in short- जुन्या संस्कृतिला त्यामुळे फार नुकसान होते असे तिला प्रामाणिकपणे वाटत होते.

पण बाहेरच्या जगाला exposure चे पण फायदे असतात. आम्ही राहातो तिथली पण संस्कृति होती. पण अशी जुनी संस्कृति इतक्या सहजा–सहजी नामशेष होत नाही. उलट त्याचा प्रसार होतो. माझं आपलं प्रतिपादन. परंतु लद्दाखी संस्कृति बहुत special है ना मी तिच्याशी वाद घातला नाही. दोन वर्षापूर्वी बीकानेर, जैसलमेर पाहिलेली राजस्थानी कला मला आठवत होती. अहमदाबादला पाहिलेली गुजरातची कशिदाकारी पण आठवली. पण सगळ्या cultureal नी संस्कृति नष्ट न होतो पसरते हे जरी खरं असलं तरी त्यातून नेहमीच माणसाला आंतरिक सुख मिळतं का ? असा प्रश्न कुठंतरी माझ्या मनांत होता. त्यामुळे माझ्या argument विषयी मी स्वतःच साशंक होते. खरंतर लेहमध्ये फिरताना तिथल्या लोकांमधला साधेपणा, एकमेकांवरचा विश्वास, सभ्यता, mutual understanding पाहून मला कुठंतरी माझ्या लहानपणीचं आजीकडे राहात असतानाचं माझ्या आठवणीतलं पुणं आठवत होतं म्हणून आता आहे त्या स्वरूपांत लेह बदलायला हवं का ? ह्या प्रश्नाचं उत्तर अजूनही माझ्याकडे नाही.

पण ते नक्कीच बदलणार आहे. आमच्यासारखे आणि इतरही लोकं तिथे जाणार local लोकं त्यांना follow करणार हे आहे.

Commercialisation ची थोडी–थोडी झलक आम्हाला थोडी फार आली पण अनुभवाला. टीप दिल्यावर लोकांच्या वागण्यातला फरक, गो–या लोकांना preferrential treatment वगैरे पण त्यामानाने फार कमी.

बाजारात फिरताना चार ठिकाणी किमती विचारल्या तर साधारण समानता दिसते. माल विकण्यासाठी मागे पडत नाहीत. अव्वाच्या सव्वा bargaining ही नाही. एका दुकानात एक बूट आवडले म्हणून बाहेरूनच किमत विचारली तर 700 रू. सांगितली. नंतर दुस–या दुकानात गेलो तर तेच बूट 770 ला. 720–30 पर्यंत खाली आला पण शेजारी 700त मिळतात म्हणालो तर सरळच म्हणाला खरं तर 700 हे last पण 770 सांगून पहातो तेवढेच 20–30 वर मिळाले तर. तसं तर ते दुकानपण माझचं आहे.

लद्दाख मधे as such विशेष काही manufacture होत नाही. तिब्बेट किंवा काश्मिर–श्रीनगर मध्ये बनलेल्या वस्तु तिथे विकायला येतात आणि ाकही गोष्टी चायना मधून.



काश्मीरच्या शाली, गालिचे, paper masche च्या डब्या, केशर इ. तिबेट मधून jewellary वगैरे, चायना मधले कप आणि soup bowels, thermas flask इ. काही

कलाकुसरीच्या गोष्टी आणि विदेशी पर्यटकांच्या attractions ची राजस्थानी painting, चादरी वगैरे, लोकनृत्यचे mask वगैरे मुख्यतः दुकानांमध्ये दिसतात. हिन्दू मुस्लिमांची दुकानं सरमिसळ दिसतात. साधारणतः एकटा दुकानदारचं दुकानाचे सर्वकाही असतो. दुकानात जायचा दरवाजा छोटा–सा असतो त्याच्या बाहेर स्टूलवर बसून किंवा उभं राहून दुकानदार आजू–बाजूच्या लोकांशी गप्पा मारत असतो कुठंतरी कंटाळा आला तर कुलुप लावून फिरून येतो, जरा वेळाने दरवाजा ढकलून आत जावं त्यानंतर 3–4 मिनिटांनी दुकानदार आत येतो आणि वस्तु दाखवतो. बाजाराचे रस्ते वगैरे स्वच्छ होते. उकिरडा वगैरे कुठेही दिसला नाही. गल्ली बोळात कुठे तरी एखादे वेळेस उघडी गटारं असतील पण in general स्वच्छता होती. मुख्य म्हणजे भिकारी कुठेही दिसले नाहीत. एका दुकानात काही घेताना एक भिकारी दिसला तर दुकान चालवणारे म्हणाले हे लोकं season मध्ये बाहेरून येतात, आई–वडील नौकरी करतात, मोकळी मुलं कबाड्याचं काम करतात, धाकटी मुलं भीक मागतात आणि परत जाताना विमानांत बसून जातात. असे हे बाहेरून येणारे लोकं. मुख्यतः बिहारी लोकं कामासाठी आलेले दिसतात. जे पण थोडे फार बाहेरचे लोकं काम करताना दिसतात त्यामध्ये Article 370 मधून पळवाट काढून कुणाचे तरी भाडेकरी म्हणून अनेक वर्ष तिथे राहाणारं एक बिहारी कुटुंब भेटलं पण अशी माणसं त्यामानाने कमी. Ground floor वर दुकानं आणि first floor वर मध्ये–मध्ये हॉटेल्स असा pattern दिसला. मुख्यतः तिबेटी जवेणाची दुकानं. एक दुकान छोले–भटूरेचं होते. तिथे कुठल्याही वेळेला गर्दी दिसत होती.

चीनी crockery ची दुकानं आणि इतर ही छोट्या–मोठ्या वस्तुंची दुकानं 'मोती मार्केट' म्हणून तुळशी बागेसारख्या किंवा इंदूरच्या आडव्या बाजारासारख्या पण ब–याच मोठ्या भागात पसरलेल्या मार्केटमध्ये आहेत. तिथे थोडा भावांमध्ये फरक दिसतो पण bargaining विशेष नाही.

दोन दिवस दुसरा काही उद्योग नसल्याने बाजारातच खूप फिरलो. छोट्या–मोठ्या गोष्टींची बरीच खरेदी झाली. पण बाजार रात्री मात्र लवकर बंद होतो. 9 वाजे पर्यंत खाण्या–पिण्याची पण बहुतेक सारी दुकानं बंद होतात. रात्री 11 ते सकाळी 6 पर्यंत वीज बंद. दिवसापण बराच वेळ बंद असते. पाण्याची पण कमतरता आहे. वाहनं धुण्याला officially मना आहे. पण कुठे कशासाठी हाय–हाय नाही दिसली.

एक दिवस Tourist information centre ला गेलो होतो. तिथे पण आम्ही गेल्यावर 4–5 मिनिटांनी दोन बायका आल्या. काही pamplets दाखवली. सिंधू दर्शन, लद्दाख festival विषयी माहिती सांगितली. लालकृष्ण आडवाणींच्या सिंधू दर्शन उपक्रमामुळे किंवा otherwise ही ते या भागात खूप popular आहेत. May not be his party पण local लोकांना श्री. आडवाणींविषयी व्यक्तिशः आदर आणि प्रेम आहे असे कळले.

तर असे हे लेह–लद्दाख तिथे फिरताना, तिथल्या लोकांशी बोललो. त्यातून आम्हाला दिसले ते अद्भुत आणि वेगळेच निसर्ग सौंदर्य आणि साध्या–सरळ माणसांमुळे मनाला वेधून घेणारं.

आता जायचे वेध लागू लागले होते. पण castel Tsemo च्या treak शिवाय आमची story पूर्ण होत नाही.

Monastry पर्यंत चढून लेह पॅलेस पर्यंतचा मिनी ट्रेक म्हटलं तर ट्रेक म्हटलं तर नाही मी मुलांबरोबर केला. लेह पॅलेसच्या बाहेर पडलो तर त्याच्या शेजारीच एक खडकाळ टेकडी आम्हाला दिसली. शेजारी पाटी होती Castel Tsemo कॅसल त्सेमा. चला थोडं rock climbing करू असं म्हणून मुलं आणि नितिन निघाली. येतील थोड्यावेळांत वर जाऊन, मला मात्र confidence नव्हता वाटतं stamina पण नव्हता म्हणून मी खालीच बसले पायथ्याशी. पण अपेक्षे प्रमाणे वरती पाहिलं तर अजून पोहोचलेच नव्हते. जरा वेळाने पाहिलं तर टेकडीच्या एका बाजूला मुकलं आणि दुस–या बाजूला नितिन उभा. ब–याच वेळाने तिघं एका ठिकाणी आलेले दिसले. ज्या रस्त्याने गेले तिथून परत येणे शक्य नव्हतं कारण ब–यापैकी steep खडकाळ चढण होती. मग बाजूने कुठुनतर रस्ता शोधत उतरले खाली आल्यावर कळले की कॅसल सारख हिल टॉप वर काही सपाट भागचं नव्हता थोडेसे चौडे दोन उंचवटे त्याना जोडणारी एक narrow bridge आणि पलीकडच्या बाजूला खाई / दरी म्हणून एवढा वेळ लागला. उतरताना पण steep उतार खाचा कमी आणि भुसभुशीत जमीन. त्यामुळे उतरणे पण उवघड होते.

मी खाली उभं राहून यांचे उतरणं पाहात होते तेव्हां एक tourist family jeep मधून आली अजून तर सीजन सुरू व्हायचाय जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर मधे विदेशी पर्यटक येतील तेव्हां आमची कमाई जोरदार होईल. तो पर्यंत काम करायचं मग थंडी मध्ये जायचं मजा करायला, गोवा–चंदीगड सिनेमे पाहायचे, आराम करायचा. तेव्हां आम्ही पर्यटक असतो आणि मनसोक्त खर्च करतो. एकूण संग्रही वृत्ति कमी त्यांचा टॅक्सी वाला सांगत होता. तेव्हृयात त्यांचे माझ्याकडे लक्ष गेले, या तिघांना उतरताना पाहून त्यांच्या 7–8 वर्षाच्या मुलीला इतकी काळजी वाटत होती. 'आता हे लोकं कसे खाली येतील' म्हणून. तोवर ते उठत–बसत आणखी थोडं खाली आल्यावर मग तिचा जीव भांड्यात पडला. किती निष्पाप आणि निःस्वार्थी असतात काही मुलं.

तर ट्रेकिंगची हौस ही अशी फिटली. आता दुस–या दिवशी परत यायचं होतं.

**10-06-2005**

सकाळीच उडून एयरपोर्ट वर जायचं होते. आमच्या Host चीच टॅक्सी आम्हाला सोडणार होती. रात्री bill clear करून निरोपा–निरोपी झाली. श्री. बोध चंदीगडला गेले.

Fotunately आकाश स्वच्छ होतं. कारण दोनच दिवसापूर्वी खराब हवामाना मुळे एक विमान कॅसल झाल्याचे कळले होते. टॅक्सीचा आमचा योगच असा, निघाल्यावर थंडीमुळे टॅक्सी चालू होईना. Mrs. अंगमो ने कुठे–कुठे फोन करून दूसरी टॅक्सी मागविली पण ती मेनरोड पर्यंतच येणार होती. सामान काढून आम्ही निघालो. त्याच दिवशी पंतप्रधान लेहला येणार असल्याने security खूप होती. चेकिंग वगैर हर्डल्स पार करत आम्ही एकदाचे एयरपोर्ट वर पोहोचलो. निळ्याशार पाण्याचे कुठलेच लेक न पाहिल्याची थोडी रूखरूख होती पण जे पाहिलं ते पण इतकं सुंदर होतं की लेक पाहायच्या निमित्ताने पुन्हा इकडे यावे असे वाटत होते. विमानतळावर आम्हाला एक दिल्लीचे कुटुंब भेटले. त्यांनी दिल्लीच्या उन्हाळ्यातून डायरेक्ट लेहला fly केले होते. त्यांना लेह मध्येच mountain sickness झाला. त्यामुळे कसे घाबरले होते हे आम्ही अनुभवलेच होते. पण tourist information centre मध्ये पण direct by air गेलं तर पहिले 36 तास काहीच करू नका असाच सल्ला देतात. Well लोकांनी पण त्यांना घाबरवले त्यामुळे तिकिटं मोठ्या मुष्किलिनी prepone करून ते बिचारे परत निघाले होते. आपण आधी भेटलो असतो तर नक्कीच त्यांना मदत करू शकलो असतो.

आपण डॉक्टर असल्याची तेव्हां आठवण झाली. तशातर लेहमध्ये पण आम्हाला डॉक्टर्सच्या पाट्या विशेष दिसल्या नव्हत्या. एक कुठे तरी X-ray आणि सोनोग्राफी सेंटरचा बोर्ड दिसला होता आणि एक मोठे सरकारी आणि एक मिलिटरी हॉस्पिटल बस.

तर त्यांच्याशी बोलत आम्ही विमानात बसलो. चहूबाजूंनी उंच पर्वत असल्याने आणि relatively छोटा runway असल्याने skilled takeoff घ्यावा लागतो. Usually थोडी height घेऊन गावावर एक–दोन चकरा मारून मग विमान gradually height gain करते त्यामुळे पुन्हा एकदा एक वेगळ्याच angle मधून लेहचे एक मनोहारी रूप डोळ्यात साठवत आम्ही दिल्लीच्या मार्गाला लागलो.

लेहच्या रस्त्यावरचा भिकारी, छोले–भटूरेच्या दुकानांत वापरले जाणारे खराब तेल आणि विदेशी पर्यटकांकडून पैसे घेण्यसाठी देशी पर्यटकांना खोळंबवून ठेवून मंदिराचे दार बंद करणारा लामा या गोष्टी मला अधून–मधून अस्वस्थ करतात. keep city clean, do not litter here & there ची posters singned sby leh protacting group कुठे–कुठे दिसली.

छोटा, आदर्शवादी समाज, बहुतेक एकमेकांना ओळखणारी आणि कठिण नैसर्गिक परिस्थिती मुळे परस्पर सहकार्यानेच सर्वांचे हित समजणारा समाज. सगळे एकमेकांना ओळखणारे त्यामुळे रस्त्यावर, कुठल्या घराच्या आडोशाला लघुशंका करायला किंवा भीक मागायला लोकांना लाज वाटते. पण लाज सोडली तर विमानात बसण्या इतका पण पैसा सहजी मिळू शकतो यातून कुणाला स्फूर्ति मिळू शकेल का ? समाज थोडा मोठा झाला गावं वाढले की हळू-हळू personal touch कमी होतो. कुणी एकमेकांना conveniently ओळखेनासे होते. रस्त्यावर लघुशंका करणा-या माणसाकडे तिरस्काराने बघणारे लोकं आपल्यावर ही कधी अशी वेळ येऊ शकते, चलता है असा विचार करून हळूच त्याकडे काना-डोळा करू लागतात साहजिकच करणा-याची पण भीड चेपते. मग हळू-हळू अनैतिकतेच्या पुढच्या पाय-या, त्याचे समर्थन करत समाज हळू-हळू भ्रष्ट होऊ लागतो. मग त्यातून निर्माण होणारी असुरक्षिततेची जाणीव, stress, संकुचित मनोवृत्ति, गटबाजी वगैर-वगैरे ही प्रगती बरोबर येणारी देणगी आहे. आपल्याला मिणा-या सुख-सुविधांची किंमत ?

लहानपणी शाळेत असताना 'आजच्या समाजाला व्यावसायाभिमुख शिक्षण पद्धतीची गरज आहे का' ? अशा विषयावर debate झाले होते तेव्हां अमेरिकेतल्या चकचकीत वस्तु, ऐकलेल्या नवलकथा आणि मोठ्या-मोठ्या इमारतींची चित्रं आठवून या विषयावर debatee चं कसं होऊ शकतं. पण तेव्हां पण opposition ने मांडलेला 'हे सर्व पेलायला लागणारा नैतिकतेचा पाया हे शिक्षण देईल का' ? हा प्रश्न कुठंतरी मनांत घर करून राहिला होता. या दोन्हीचा सुवर्णमध्य गाठणं कुणाला शक्य होईल का ? समाजाला दिशा कोण देतं ? अनेक न संपणारे प्रश्न.

आणि पर्यटकांकडून पैशाची अपेक्षा करताना कामाची जवाबदारीची उपेक्षा करणारा लामा, धर्मस्थालांकडे किती पैसा असावा आणि तो कसा यावा ? शंकराचार्यांच्या गादीवर बसणा-या माणसाचे मन भ्रष्ट करणारा हा पैसा आणि ही सत्ता, मग तो लामा तरी मनावर किती ताबा ठेवणार ?

नुसतेच प्रश्न त्यांची उत्तरं कशी आणि कुठे शोधायची.

मला कधीतरी वाटतं या सगळ्यामागे नेहमीच वाईट हेतूने सुरवात होते असं नाही. समाजात नैतिकतेचं प्राबल्य असताना काहीतरी वेगळं करून स्वतःचं महत्व attension seeking वागण्यातून झालेली सुरवात मग सवय आणि गरज बनून इतरांनापण प्रेरणा देते आणि मग अनैतिकतेचे प्राबल्य असताना पुन्हा काही वेगळेपणा करण्यातून पुन्हा नैतिकतेकडे माणसं वळू लागतात. आपला देश सध्या दुस-या catagary मध्ये आहे का ? जिथे अनैतिकतेलाच सामाजिक मान्यता आहे. समृद्धि बरोबर पुढचे नैतिकतेकडचे परिवर्तन येईल अशी आशा करू या.